## सामाईक आदेश निशाणी क. ३७ व ३८ खाली

(ता. ०५/०१/२०१७ रोजी पारित केला)

१) मयत प्रतिवादी क. १ श्रीपती रामू कोरवी याचे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर आणणेसाठी झालेला विलंब माफ करून सदर प्रतिनिधींना अभिलेखावर आणणेची परवानगी मिळणेसाठी वादींनी अनुक्रमे मुदत मर्यादेचे कायद्याचे कलम ५ व दिवाणी प्रक्रिया संहितेचे ऑर्डर २२, रूल ४ नुसार सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

२) वादींनी सदर अर्जात असे नमुद केले आहे की, प्रतिवादी क. १ चा मृत्यू ता. २३/११/२०१३ रोजी झाला. परंतु, त्याचे कायदेशिर प्रतिनिधींना अभिलेखावर आणणेसाठी १ वर्ष व १० दिवसांचा विलंब झाला आहे. प्रतिवादी क. १ पासून वादी खूप दूर राहतात. त्यांचेमध्ये मतभेद असल्यामुळे प्रतिवादी क. १ चे मृत्यूबाबत वादींना समजले नाही. त्यांना त्याबाबत तीन ते चार महिन्यापूर्वी समजले. त्याचा मृत्यूचा दाखल मिळविणेचा वादींनी प्रयत्न केला. परंतु, त्याचे मृत्यूची नोंद झालेली नसल्यामुळे त्यांना दाखल मिळाला नाही. प्रतिवादी क. १ चे अभिलेखावर असलेल्या वारसांशिवाय इतर वारसांचे पत्ते प्रयत्न करूनही वादींना मिळाले नव्हते. त्यात बराच कालावधी गेला. सदर वारसांचे पत्ते मिळताच वादींनी हा अर्ज दाखल केला आहे.

३) प्रतिवादी क. १ चे वारसांपैकी प्रतिवादी क. २, ३ व ४ हे पूर्वीपासून अभिलेखावर आहेत. त्यांचे व्यतिरिक्त सौ. चंदा दिलीप कोरवी व शांता कुमार कोरवी हे त्याचे वारस आहेत. त्यामुळे प्रतिवादी क. १ चे उर्वरीत दोन कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ करून सदर प्रतिनिधींना अभिलेखावर आणणेची परवानगी देणेची विनंती वादींनी केली आहे.

४) उपरोक्त नमुद दोन प्रास्तावित प्रतिनिधींना प्रस्तुत अर्जाची नोटीस पाठविणेत आली. परंतु, चंदा दिलीप कोरवी हिचेवर नोटीसची बजावणी होऊनही ती प्रस्तुत कामात हजर झाली नाही. शांता कुमार कोरवी ही प्रस्तुत कामात हजर झाली. परंतु सदर अर्जांना तिने तिचे म्हणणे दिले नाही.

५) प्रतिवादी क्र. २ व ४ यांनी निशाणी क्र. ४२ वर त्यांचे म्हणणे दिले आहे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, प्रतिवादी क्र. १ चे घराजवळच वादी राहतात. त्याचे मृत्यूसमयी वादी क्र. ३ तेथे हजर होती. प्रतिवादी क्र. १ चे मृत्यूची नोंद तात्काळ करणेत आली होती. त्यामुळे अर्जातील कारणे खोटी असल्यामुळे तो नामंजूर करणेची विनंती प्रतिवादी क्र. २ व ४ यांनी केली.

६) मी उभय पक्षांचे युक्तीवाद ऐकले. प्रतिवादी क्र. १ विरूध्द दावा खंडित झालेला आहे. परंतु, सदरची बाब रद्द करून मिळणेसाठी वादींनी अर्ज दिलेला नाही. मा.ना. मुंबई उच्च न्यायालयाने ***रामदुलारी सितलाप्रसाद तिवारी व इतर वि. मनीराम रामप्रसाद तिवारी व इतर, २००४(२) बी. सी.जे. १९१*** ह्या निर्णयविधीत असे निरिक्षण नोंदविले आहे की, दावा खंडित झाल्याची बाब रद्दबाबत करून मागणेसाठी स्वतंत्र अर्ज दाखल केलेला नसला तरी केवळ त्याच करणाासाठी मयत पक्षकाराचे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर आणणेचा अर्ज नामंजूर केला जाऊ शकत नाही.

७) मी अभिलेखाचा अभ्यास केला. प्रतिवादीचे मृत्यूपासून ९० दिवसांचे आत त्याचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर आणणे आवश्यक असते. प्रतिवादी क्र. १ चा मृत्यू ता. २३/११/२०१३ रोजी झाला असून सदरचे अर्ज ता. ०३/०३/२०१५ रोजी दाखल करणेत आला आहे. त्यामुळे त्याचे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर आणणेसाठी सुमारे एक वर्ष व तीन महिन्यांचा विलंब झालेला आहे. वादींचा दाव्यातील पत्ता व प्रतिवादी क्र. १ चे प्रस्तावित कायदेशीर प्रतिनिधी यांचा वादींनी दिलेला पत्ता पाहता ते वेगवेगळया ठिकाणी राहत असल्याचे दिसते. त्यामुळे प्रयत्न करूनही प्रस्तावित कायदेशिर प्रतिनिधींचे पत्ते वादींना मिळाले नाहीत, ही बाब विश्वसनीय वाटते.

८) तसेच, सदरचा दावा मिळकतींचे वाटपासाठी दाखल करणेत आलेला असून प्रतिवादी क्र. १ चे कायदेशीर प्रतिनिधींनी अभिलेखावर आणलेस दाव्यातील मागण्यांबाबत अंतिम स्वरूपात निर्णय देणे न्यायालयास सोईचे ठरेल. सदर प्रतिनिधींना अभिलेखावर न आणलेस बहुविध खटल्यांची शक्यता नाकारता येत नाही. तसेच, प्रतिवादी क्र. १ चे मृत्यूमुळे त्याचे विरूध्द दावा खंडित झालेला असला तरी वर नमुद केलेल्या **रामदुलारी सितलाप्रसाद तिवारी** ह्या निर्णयविधीचा विचार करता प्रतिवादी क्र. १ चे मृत्यूमुळे

त्याचे विरूध्द दावा खंडित झाल्याची बाब रद्दबातल करणेसाठी स्वतंत्र अर्जाची आवश्यकता नाही, असे माझे मत आहे. अशा परिस्थितीत, प्रतिवादी क्र. १ चे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ करून त्यांना अभिलेखावर आणणेची परवानगी देणेस मला कोणताही अडथळा दिसत नाही. वरील कारणांमुळे मी खालील प्रमाणे आदेश पारित करतो.

**<u>आदेश</u>**

१) दोन्ही अर्ज मंजुर करणेत येत आहेत.

२) मयत प्रतिवादी क्र. १ श्रीपती रामू कोरवी याचे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ करणेत येत असून सदर प्रतिवादींना अभिलेखावर आणणेची परवानगी देणेत येत आहे.

३) त्या अनुषंगाने वादींनी दाव्यात आवश्यक ती दुरूस्ती चौदा दिवसांत करावी.

४) वादींनी प्रतिवादींना रक्कम रू. ३००/— (अ.रू. तीनशे मात्र) खर्च (cost) म्हणून द्यावेत.

ता. ०५/०१/२०१७
इचलकरंजी

सही
(अ. प्र. कोकाटे)
३रे सह दिवाणी न्यायाधीष कनिष्ठ स्तर,
इचलकरंजी

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | S. A. Patil |
| Name of Court | A. P. Kokate,<br>3rd Jt. Civil Judge, Jr.Dn. & Judicial Magistrate F.C. Ichalkarnaji. |
| Date of Dictation | 05/01/2017 |
| Judgment/order signed by P.O. on | 05/01/2017 |
| Judgment/order uploaded on | 05/01/2017 |